**सन २०१९-२० मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत "कृषि जनजागृती मोहिम" राबविण्यास प्रशासकीय मान्यता...**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र.क्र.७०/३-अे**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २७ ऑगस्ट, २०१९

**वाचा :**

१) राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीच्या २७ व्या बैठकीचे इतिवृत्त -शासन पत्र क्र. राकृवि-०५१९ / प्र.क्र.१४३/ राकृवियो कक्ष, दि.१८.७.२०१९

२) आयुक्त (कृषि) यांचे पत्र क्र. विप्र-४/ रा.कृ.वि.यो / प्रस्ताव /१९०/२०१९, दि.८.४.२०१९

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मावज २०१६/प्र.क्र.३९७/३४, दि.५.१.२०१७

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मावज २०१७/प्र.क्र.१५३/३४, दि.२१.७.२०१७

५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मावज २०१६/ प्र.क्र.१५३/३४, दि.१.६.२०१८

**प्रस्तावना :-**

सन २०१९-२० मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समिती ( SLSC) च्या दि.०४.७.२०१९ च्या २७ व्या बैठकीत "कृषि जनजागृती मोहिम" हा प्रकल्प सन २०१९-२० मध्ये राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे व प्रस्तुत प्रकल्प राबविण्यासाठी रु.२९६.०० लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तदनुषंगाने, या प्रकल्पास सन २०१९-२० करिता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

१ सन २०१९-२० मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत "कृषि जन जागृती मोहिम" हा प्रकल्प राबविण्यासाठी ₹. २९६.०० लक्ष (अक्षरी रुपये दोनशे शहयान्नव लक्ष फक्त) एवढ्या प्रकल्प खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२ सन २०१९-२० मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत कृषि जन जागृती मोहीम राबविण्यासाठी सदर प्रकल्पांतर्गत समाविष्ट घटक व त्याकरिता मंजूर भौतिक व आर्थिक लक्षांक सोबतच्या परिशिष्टानुसार राहील.

३ सन २०१९-२० मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत कृषि जनजागृती मोहीम राबविण्यासाठी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना कार्यक्रमाचे कार्यान्वयन तसेच संनियंत्रण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी प्रस्तुत प्रकल्प राबविण्याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन कृषि विभागाच्या कार्यालयीन पध्दतीत अंतर्भाव करावा व सदरहू प्रकल्प आधारित कृषि जन जागृती मोहीम राज्यात राबविण्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४ राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत कृषि जनजागृती मोहीम राबविताना संदर्भाधीन दि. ५.१.२०१७, दि. २१.७.२०१७ व दि. १.६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जनजागृती मोहिम तसेच जाहिरात मोहिम राबविण्यासाठी दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करावा.

५ राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सन २०१९-२० मध्ये कृषि जन जागृती मोहीम राबविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत असलेला ₹. २९६.०० लक्ष निधी सन २०१९- २० या चालू वित्तीय वर्षात अखर्चित राहणार नाही याची अंमलबजावणी यंत्रणांनी दक्षता घ्यावी. तसेच संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी निधी विनियोगाची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास वेळोवेळी सादर करण्याची कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२७१७२२१०९००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.08.27 17:30:31 +05'30'

**(अशोक आत्राम)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति-**

१) आयुक्त,कृषि,महाराष्ट्र राज्य, पुणे
२) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,

**प्रत,**

१) मा.मंत्री (कृषि ) यांचे खाजगी सचिव
२) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३) मा. सचिव ( कृषि), कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
४) महालेखापाल, ( लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र-१ मुंबई
५) महालेखापाल, ( लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र-२ नागपूर
६) सर्व संचालक / कृषि सह संचालक, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
७) सर्व विभागीय कृषि सह संचालक
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई.
९) अवर सचिव /कार्यासन राकृवियो, कार्यासन २ अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई ३२.
१०) वित्त विभाग कार्यासन व्यय-१/ अर्थ-३, नियोजन विभाग कार्यासन १४३१, मंत्रालय,मुंबई ३२.
११) निवड नस्ती (का.३ अे)

**शासन निर्णय कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**क्रमांकः संकीर्ण २०१९ /प्र.क्र.७०/३-अे, दिनांक: २७ ऑगस्ट, २०१९ सोबतचे परिशिष्ट -:**

(रु. लाखात)

| अ.क्र. | घटक | आराखड्यानूसार एकुण किमंत |
|---|---|---|
| १. | विभागस्तरीत्य कार्यशाळा/चर्चासत्राचे आयोजन | ६.०० लक्ष |
| २. | अ) प्रिंट/इलेक्ट्रोनिक/दृकश्राव्य माध्यमे वर्तमानपत्रांमधून जाहिराती व प्रसिद्धी घडीपत्रिका, पोस्टर्स, आकाशवाणी दुरदर्शन, मोबाईल व्हॅन इ. द्वारे प्रचार प्रसिद्धी | २६२.०० लक्ष |
| | ब) एस टी बसेसच्या आउटसाईड पॅनलद्वारे प्रचार प्रसिद्धी | |
| ३. | नाविन्यपुर्ण घटक (चित्ररथ -२०२०) | २५.०० लक्ष |
| ४. | आकस्मिक निधी | ३.०० लक्ष |
| | **एकुण** | **२९६.०० लक्ष** |